# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.05.2026** **वारः बुधवार**

---

1. चंद्रपूरच्या उज्वला सोयम यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय फ्लोरेन्स नाईटिंगेल पुरस्काराने गौरव
2. वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची 'नीट', पेपरफुटीमुळे रद्द, सीबीआयकडे तपास
3. आसामचे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे हिमंता बिस्वा सर्मा यांचा सलग दुसऱ्यांदा शपथविधी
4. नाशिक महापालिकेला केंद्र सरकारकडून 272 कोटी रुपयांचा अर्बन चॅलेंज फंड मंजूर आणि
5. सांगली जिल्ह्यात मोटेवाडी इथं भिंत कोसळून सहा भाविकांचा मृत्यू

**परिचारिका दिन**

आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी देशभरातील निवडक 15 परिचारिकांचा उत्कृष्ट सेवेसाठी सन्मान करण्यात आला. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातल्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागात आरोग्यसेवा देणाऱ्या उज्ज्वला सोयम यांचा समावेश होता. कन्या भ्रूणहत्या रोखण्यासाठी त्यांनी केलेलं काम तसंच आरोग्य जनजागृतीसाठी घेतलेला पुढाकार यासाठी त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते गौरवण्यात आलं.

**नीट परीक्षा**

गेल्या 3 मे रोजी झालेली वैद्यकीय प्रवेशासाठीची नीट युजी परीक्षा रद्द केल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं काल जाहीर केलं. परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका फुटल्याच्या पार्श्वभूमीवर परीक्षेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं संस्थेनं सांगितलं. केंद्र सरकारनं या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवला आहे. ही परीक्षा पुन्हा होणार असून त्याचं वेळापत्रक लवकरच अधिकृत माध्यमांतून जाहीर केलं जाईल. पुन्हा होणाऱ्या परीक्षेसाठी नव्यानं अर्ज भरण्याची किंवा अतिरिक्त परीक्षाशुल्क भरण्याची गरज नाही.

दरम्यान, या प्रकरणी राज्यातून दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आलं असून त्यातील एकाला नाशिकमधून ताब्यात घेण्यात आलं. राजस्थान पोलिसांच्या विनंतीनुसार नाशिक पोलिसांच्या गुन्हे शाखेनं ही कारवाई केली.

**आसाम मुख्यमंत्री**

भाजपाचे वरीष्ठ नेते हिमंता बिस्वा सर्मा यांनी काल आसामच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी सर्मा यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. आसामचे मुख्यमंत्री म्हणून हिमंता बिस्वा सर्मा यांचा हा सलग दुसरा कार्यकाळ असेल.

या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रिय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांचे नेते, भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

**विधान परिषद**

राज्याच्या विधान परिषदेतल्या दहा नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी उद्या होणार आहे. विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे त्यांना सदस्यत्वाची शपथ देतील. द्विवार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेले डॉ. नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, अंबादास दानवे, प्रमोद जठार, झीशान सिद्दीकी, माधवी

नाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे, संजय भेंडे आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या डॉ. प्रज्ञा सातव यांचा नवनिर्वाचित आमदारांमध्ये समावेश आहे.

**नाशिक**

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर हरित रोखे काढून भांडवल उभारणाऱ्या नाशिक महापालिकेला केंद्र सरकारने 272 कोटी रुपयांचा अर्बन चॅलेंज फंड मंजूर केला आहे. त्यामुळे महापालिकेला काही महत्त्वकांक्षी प्रकल्प उभारण्यास मदत होणार असल्याची माहिती नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. या निधीमधून निर्मल गोदावरी, शुद्ध गोदावरी, रामकालपथ प्रकल्पाचा दुसरा टप्पा, वाहतूक व्यवस्थापन अशा विविध प्रकारच्या प्रकल्पांना आर्थिक मदत होणार आहे, असं त्यांनी सांगितलं.

**राज्यपाल**

पंढरपूर आणि सातारा इथं माजी सैनिकांसाठी एकात्मिक कल्याण केंद्र उभारण्याचा प्रस्ताव पाठवण्याला राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी मान्यता दिली आहे. माजी सैनिकांचं पुनर्वसन आणि पुनर्स्थापनेसाठीच्या विशेष निधी समितीची वार्षिक बैठक काल राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते. माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणाच्या विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांनाही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

**पोलिस घरे**

जनतेच्या सुरक्षेसाठी सातत्यानं कार्यरत असणाऱ्या पोलिसांना घरं मिळायला हवीत, यासाठी घरबांधणी अग्रीम स्वरूपात सुमारे 17 शे 68 कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. याचा लाभ 5 हजार 459 पोलीस कर्मचाऱ्यांना होणार आहे.

**बावनकुळे**

महात्मा गांधी यांनी दिलेल्या स्वदेशीच्या विचारालाच पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे नेत आहेत. देशातील संपत्ती देशातच राहिलीपाहिजे, देशाच्या आर्थिक बळकटीसाठी स्वदेशीचा विचार महत्त्वाचा आहे असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांच्या स्वदेशीच्या आवाहनावर टीका करणाऱ्या विरोधकांना उत्तर देताना ते काल नागपूरमध्ये प्रसार माध्यमांशी बोलत होते. पेट्रोल-डिझेलला इथेनॉल आणि विजेला सौरउर्जा हा प्रभावी पर्याय आहे. स्वदेशीच्या मुद्द्यावर राजकारण करण्याऐवजी जनतेचं समुपदेशन करण्याची गरज आहे असं बावनकुळे म्हणाले.

**शेकरू संवर्धन क्षेत्र-सिंधुदुर्ग**

विकासाच्या आंधळ्या स्पर्धेत कोकणातली जंगलं कमी होत आहेत. अशा काळात बांदा गावातले मानसोपचार तज्ज्ञ डॉ.रुपेश पाटकर यांनी शेकरू या राज्य प्राण्यासाठी आपलं अख्खं बागायत क्षेत्र राखीव घोषित केलं. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**डॉक्टर रुपेश पाटकर यांनी बांदा गवळीटेम्ब इथल्या स्वतःच्या मालकीच्या तब्बल आठ एकर बागायती क्षेत्राला शेकरु संवर्धन क्षेत्र म्हणून घोषित करत या बागायतीत गेली काही वर्ष शेकरू या प्राण्याला पूर्णता अभय दिलंय.गवळी टेम्ब येथील डॉक्टर पाटकर यांच्या बागायतीत सुमारे 35 वर्षांपूर्वी पहिल्यांदा त्यांच्या वडिलांना शेकरु दिसला आणि तिथून या एका अनोख्या संवर्धन प्रवासाला सुरुवात झाली. हाच भाव पुढे डॉक्टर पाटकर यांच्या विचारांचा पाया बनला. याच काळात पर्यावरण क्षेत्रातील त्यांचे मित्र मल्हार इंदुलकर यांनी शेकरु हा सर्वात संरक्षित आहे, हे लोकांना सांगितलं पाहिजे, हे डॉक्टरांच्या लक्षात आणून दिला. त्यानंतर डॉक्टर पाटकर यांनी आपल्या बागायतीत जागोजागी जनजागृती करणारे फलक लावले. शेकरु संरक्षित प्राणी आहे, त्याला मारणं गुन्हा आहे. निसर्ग वाचवा. असे संदेश परिसरात झळकू लागले. या छोट्याशा उपक्रमाचा परिणाम अत्यंत मोठा झाला. लोकांच्या मनात जागृती निर्माण झाली परिसरातील शिकारीचे प्रकार कमी झाले. म्हणूनच गवळी टेम्ब येथील शेकरू संवर्धन क्षेत्र हे केवळ एका खारीसाठी राखून ठेवलेलं आठ**

**एकर क्षेत्र नाही, तर ते माणूस आणि निसर्ग यांच्यात अजूनही जिवंत असलेल्या प्रेमाचं, जबाबदारीचं आणि सह अस्तित्वाचं सुंदर प्रतीक आहे.**

**प्रताप सरनाईक-मुंबई**

ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी ॲपसेवा तत्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर एफआयआर दाखलकरण्याची कठोर भूमिका परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनीघेतली आहे. या आशयाचं पत्र त्यांनी महाराष्ट्र सायबरविभागाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकांना पाठवलं आहे.

**आकाशवाणी**

आकाशवाणीच्या 90व्या वर्षपूर्तीनिमित्त पुणे आकाशवाणीनं रसिक श्रोत्यांसाठी काल एका सांगीतिक मैफिलीचं आयोजन केलं होतं. कोथरूडच्या बाल शिक्षण मंदिर सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमात संगीतकार, गायक राहुल श्रीवास्तव यांनी संगीतबद्ध केलेल्या संत कबीर, गुरु नानक आणि गालिब, निदा फाजली, यांच्यासह विविध लोकप्रिय ऊर्दू शायरांच्या रचना राजेश दातार, मृण्मयी फाटक आणि सावनी लाड या गायकांनी ताकदीनं सादर केल्या. डॉक्टर सुनील केशव देवधर यांनी अतिशय अभ्यासपूर्ण निवेदन करुन प्रत्येक रचनेमागचा अर्थ आणि रचनाकारांचा इतिहास कथन केला, त्यामुळं ही संगीतमय संध्याकाळ दर्दी पुणेकर रसिकांसाठी अतिशय उंचीची ठरली. रसिकांनी प्रत्येक सादरीकरणाला प्रचंड टाळ्यांनी दाद दिली. नव्वद वर्षपूर्तीनिमित्त आकाशवाणीतर्फे येत्या वर्षभरात विविध कार्यक्रम सादर केले जाणार आहेत.

**सांगली**

सांगली जिल्ह्यात जत तालुक्यातील मोटेवाडीइथं मरगुबाई यात्रेच्या वेळी अंगावर भिंत कोसळून सहा भाविकांचा मृत्यू झाला; तर 15 हून अधिक भाविक जखमी झाले. या यात्रेसाठी जवळ जवळ 300 भाविक आले होते. अचानक सोसाट्याचा वारा आणि पाऊस आल्यामुळे काही भाविकांनी भिंतीचा आडोसा घेतला. पण वाऱ्याचा वेग जास्त असल्याने भिंत कोसळून ही दुर्घटना घडली. या घटनेविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**निधन-सोलापूर**

सोलापूरचे माजी खासदार गंगाधरपंत कुचन यांचं काल हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते 91 वर्षांचे होते. अनेक सहकारी सूतगिरण्यांच्या उभारणीत त्यांचं मोठं योगदान होतं. 1980 आणि 85 मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत ते काँग्रेस पक्षाकडून निवडून आले होते.

**हवामान**

राज्यात तापमानाचा पारा चढाच असून काल सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं 45 अंश सेल्सिअस होतं. आजही सर्वत्र हवामान कोरडं असेल. तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.